# गोदरेजतर्फे नवी सुरक्षा उपकरणे

**पुणे :** गोदरेज सिक्युरिटी सोल्यूशन्सने पुण्यातील बाजारपेठेत वायफाय एनेबल्ड ईव्ह सीरिज आणि सी. थ्रु प्रो व्हीडिओ डोअर फोन्स अशी घर सुरक्षित करणारी नावीन्यपूर्ण उत्पादने दाखल केली आहेत. कंपनीचे मार्केटिंग हेड मेहेरनोष पिठावाला म्हणाले, इव्ह मिनी, इव्ह क्युब व इव्ह पीटी ही उपकरणांची मालिका घराच्या आवाराचे लाइव्ह फीड घरमालकांच्या स्मार्टफोन्समध्ये समाविष्ट करते व घरमालक जगभर कोठेही असले तरी त्यांच्या प्रियजनांवर दुरून लक्ष ठेवण्यासाठी मदत करते. होम कॅमेऱ्यांच्या इव्ह रेंजमध्ये मोशन सेन्सिंगवर आधारित ऑटो-रेकॉर्ड फंक्शन आहे आणि विचित्र हालचाली जाणवल्यावर ते नेहमी मालकाच्या हँडसेटवर नोटिफिकेशन पाठवते.